परिपत्रक क्र. 237

विषय:- नियमितपणे वेळेवर कार्यालयात हजर राहून काम करण्याबाबत.

या परिपत्रकाव्दारे सर्व कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सकाळी हजेरी पटावर सही केल्यानंतर आपआपल्या जागेवर असून कामास सुरुवात करावी. तसेच दुपारी जेवणाची सुट्टी अर्ध्या तासाच्यापेक्षा जास्त वेळ घेऊ नये. सदर सूचना दिलेल्या असतांना सुध्दा अद्यापी काही कर्मचारी नियमितपणे वेळेवर कार्यालयात हजर असत नाहीत व आल्यानंतर बराच वेळ कामास सुरुवात करीत नसून चहा घेण्यकरीता जागा सोडून जातात. तसेच, संध्याकाळी पण कार्यालयीन वेळेपूर्वीच कार्यालय सोडतात. दुपारची जेवणाची सुट्टी पण निश्चितपणे अर्धा तास अशी पाळली जात नाही तरी सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन शिस्ती पाळण्याच्या दृष्टीने कार्यालयीन वेळा नियमितपणे पाळाव्यात व जेवणाकरीता दिलेली सुट्टी पण अर्ध्या तासाच्या वर उपभोगू नये.

जर कर्मचाऱ्यांना जेवणाच्या व चहाच्या सुट्टी व्यतिरिक्त कार्यालयाबाहेर जावयाचे असेल तर, अगर ठरलेल्या वेळे अगोदर काया्रलय सोडावयाचे असेल तर त्यांनी शाखा अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

सर्व अधीक्षकांनी आपआपल्या शाखेतील कर्मचारी सदर सूचनांचे अनुपालन करीत नसतील त्यांची नांवे त्यांच्या शाखा अधिकाऱ्यांमार्फत आस्थापना शाखेस कळवावी.

वा.वि.चव्हाण,

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीसाठी,
सर्व शाखाचे अधिकारी,
सर्व विभागीय कार्यालयांना प्रत माहितीकरीता व आवश्यक कार्यवाहीकरीता.